**महाराष्ट्र शासन**

## ग्रामविकास व जलसंधारण विभाग

### उमेद - महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान,

जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष,जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालयाशेजारी, जिल्हा कोषागार कार्यालयासमोर,सोलापूर

**तालुका अभियान व्यवस्थापन कक्षातील सहाय्यक कर्मचारी व प्रभाग समन्वयक (कंत्राटी) भरती (Sep-2018)**

**जाहिरात क्र.01/2018-19**

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) अंतर्गत सोलापूर जिल्हयात ही योजना संपूर्णपणे इंटेंसीव्ह पध्दतीने राबविण्यात येणार आहे. त्याकरिता नव्याने इंटेंसीव्हमध्ये आलेल्या सोलापूर जिल्हयातील उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट, करमाळा, माढा, मंगळवेढा, पंढरपूर तालुक्यातील तालुका अभियान व्यवस्थापन कक्षात खालीलप्रमाणे सहाय्यक कर्मचा-यांची व प्रभाग समन्वयक कंत्राटी पदे 11 महिन्याच्या करार कालावधी तत्त्वावर भरावयाची आहेत.

**1.** प्रस्तुत जाहिरातीद्वारे नमुद केलेल्या अटींची पुर्तता करणाऱ्या उमेदवारांकडुन दि.05/09/2018 पासून ते दि.18/09/2018 या दिनांकापर्यंत ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

**2. उपलब्ध पदसंख्या:-**

**(1) प्रशासन व लेखा सहाय्यक - एकुण रिक्त पदे 07 (मासिक CTC रुपये 15,000/-)**

| प्रवर्ग | अ.जा | अ.ज. | वि.जा.(अ) | भ.ज.(ब) | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | विमाप्र | इमाव | एकुण मागासवर्गीय | खुला | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदसंख्या | 0 | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 3 | 4 | 7 |
| **समांतर आरक्षण:-** | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | 0 | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 3 | 2 | 5 |
| महिला | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 |
| माजी सैनिक | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 |

**(2) डेटा एंट्री ऑपरेटर - एकुण रिक्त पदे 06 (मासिक CTC रुपये 10,000/-)**

| प्रवर्ग | अ.जा | अ.ज. | वि.जा.(अ) | भ.ज.(ब) | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | विमाप्र | इमाव | एकुण मागासवर्गीय | खुला | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदसंख्या | 1 | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 4 | 2 | 6 |
| **समांतर आरक्षण:-** | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | 1 | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 4 | 1 | 5 |
| महिला | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 |
| माजी सैनिक | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |

**(3) शिपाई - एकुण रिक्त पदे - 08 (मासिक CTC रुपये 8,000/-)**

| प्रवर्ग | अ.जा | अ.ज. | वि.जा.(अ) | भ.ज.(ब) | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | विमाप्र | इमाव | एकुण मागासवर्गीय | खुला | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदसंख्या | 0 | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 3 | 5 | 8 |
| **समांतर आरक्षण:-** | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | 0 | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 3 | 2 | 5 |
| महिला | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 2 |
| माजी सैनिक | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 |

| **पदाचे नांव:- प्रभाग समन्वयक एकुण रिक्त पदे 38 (मासिक CTC रुपये 20,500/-)** | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रवर्ग | अ.जा | अ.ज. | वि.जा.(अ) | भ.ज.(ब) | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | विमाप्र | इमाव | एकुण मागासवर्गीय | खुला | एकुण पदे |
| पदसंख्या | 2 | 3 | 0 | 1 | 2 | 1 | 1 | 8 | 18 | (19+ 1) | 38 |
| **समांतर आरक्षण:-** | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | 1 | 2 | 0 | 1 | 1 | 1 | 1 | 4 | 11 | 6 | 17 |
| महिला | 1 | 1 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 2 | 5 | 6 | 11 |
| माजी सैनिक | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 3 | 4 |
| प्रकल्प ग्रस्त | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 |
| प्राविण्यप्राप्त खेळाडू | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 |
| अंशकालीन कर्मचारी | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 2 | 3 |
| अपंग एकुण पद 01:- 1) अंध/अल्पदृष्टी(दृष्टीक्षीणता) 2) कर्णबधीर आणि 3) अस्थिव्यंग किंवा मतीमंद या क्रमाने आळीपाळीने आरक्षित राहील. या क्रमाने ज्या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध होईल तो निवडण्यात येईल. | | | | | | | | | | | 1 |

***उपरोक्त तक्त्यामध्ये दर्शविलेल्या पदांची संख्या या बदलण्यासापेक्ष असून त्याबाबतचे सर्व अधिकार हे अध्यक्ष,निवड समिती तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,(जिल्हा अभियान संचालक,एमएसआरएलएम)सोलापूर यांनी राखून ठेवले आहेत.**

**3. पात्रतेच्या अटी:-**

3.1 भारतीय नागरिकत्त्व

3.2 वयोमर्यादा :-

3.2.1 दिनांक 18/09/2018 रोजी वय किमान 18 वर्षे व कमाल 38 वर्षापेक्षा जास्त नसावे.

3.2.2 कमाल वयोमर्यादा खालील बाबतींत शिथिलक्षम राहील:-

(1) महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागावर्गीय उमेदवारांच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा 5 वर्षे शिथिलक्षम.

(2) प्राविण्यप्राप्त खेळाडूंच्या बाबतीत उमेदवारांची उच्चतम वयोमर्यादा 43 वर्षे राहील.

(3) माजी सैनिक उमेदवारांच्या बाबतीत वयोमर्यादा शासन शुध्दीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. मासैक-1010 प्रक्र279//10/16-अ, दि. 20 ऑगस्ट 2010 आणि तद्नंतर शासनाने यासंदर्भात निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

(4) अंशकालीन उमेदवारांकरिता कमाल वयोमर्यादा 46 वर्षे शिथिलक्षम. अपंगांकरिताची कमाल वयोमर्यादा कमाल 45 वर्षे राहील.

**4. अर्हता:-**

**4.1**

| **अ.क्र** | **पदाचे नाव** | **शैक्षणिक अर्हता** | **अनुभव** |
|---|---|---|---|
| **1** | लेखा व प्रशासन सहाय्यक | वाणिज्य शाखेतील पदवी.<br>1) इंग्रजी टायपिंग 40 शप्रमी.<br>2)मराठी टंकलेखन वेग 30 शप्रमी.<br>3)किमान संगणक अर्हता- MS-CIT किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण असावी. | पदवीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर किमान 3 वर्षे प्रशासकीय व लेखाविषयक कामाचा अनुभव आवश्यक |
| **2** | डेटा एंट्री ऑपरेटर | HSC परीक्षा उत्तीर्ण (12वी)<br>1) इंग्रजी टायपिंग 40 शप्रमी.<br>2)मराठी टंकलेखन वेग 30 शप्रमी.<br>3)किमान संगणक अर्हता- MS-CIT किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण असावी. | HSC परीक्षा (12वी) उत्तीर्ण झाल्यानंतर किमान 3 वर्षे डाटा एंट्री ऑपरेटर (संगणक परिचालन) कामाचा अनुभव आवश्यक |
| **3** | शिपाई | दहावीची परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक | दहावीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर किमान 3 वर्षे प्रशासकीय कामाचा अनुभव आवश्यक |

| | | |
|---|---|---|
| **4** | प्रभाग समन्वयक (Cluster Co-Ordinator) | 1) पदवी परीक्षा उत्तीर्ण झालेनंतर तीन वर्षे सामाजिक समावेशन व संस्थीय बांधणी (ग्रामविकास, सामाजिक समावेशन, दारिद्रय निर्मुलन, उपजीविका वृध्दी योजनांतर्गत महिला, अपंग, अनुसूचित जाती व जमाती आणि समाजातील इतर वंचीत घटकांचे सामाजिक समावेशन व संस्थीय बांधणीशी) संबंधित क्षेत्रातील कामाचा अनुभव.<br>२) BSW, B.Sc. Agriculture किंवा MSW, MBA किंवा Rural Development मधील पदव्युत्तर पदवी किंवा Rural Management Degree मधील पदव्युत्तर पदवीधारकांस प्राधान्य.<br>3) पदवीच्या निकालापासून संबंधित अनुभव ग्राहय धरले जाईल. |

**4.2** सदर अर्हता व वय ही जाहिरातीनूसार अर्ज करण्याच्या शेवटच्या दिवशीच्या दिनांक रोजी गणली जाईल.

**4.3** मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.

**5.प्रमाणपत्र पडताळणी :-**

**5.1** या कार्यालयाने निश्चित केलेल्या किमान सीमारेषेनुसार पात्र ठरलेल्या उमेदवारांची पात्रता जाहिरात/ शासन परिपत्रकातील अर्हता/अटी व शर्तीनुसार मूळ कागदपत्रांच्या आधारे नियुक्तीपूर्वी सक्षम अधिकाऱ्याकडून तपासली जाईल.

**5.2** अर्जातील दाव्यानुसार मूळ कागदपत्रे सादर करणाऱ्या उमेदवारांची पडताळणी केली जाईल.

**5.3**अर्जातील दाव्यानुसार प्रमाणपत्राच्या पडताळणीनंतर पात्र ठरलेल्या उमेदवारांनाच नियुक्ती देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

**6. परीक्षेचे स्वरुप :-**

**6.1** उमेदवारांची निवड हि परीक्षेतील प्राप्त गुणांआधारे करण्यात येईल.

**6.2** परीक्षेचे स्वरुप :-

| अ.क्र. | पदाचे नांव | विषय | प्रश्न | गुण | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| 1 | लेखा व प्रशासन सहाय्यक, डेटा एंट्री ऑपरेटर, शिपाई | मराठी | 25 | 20 | 2 तास |
| 2 | | इंग्रजी | 20 | 20 | |
| 3 | | बौध्दीक चाचणी | 20 | 20 | |
| 4 | | महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान | 20 | 20 | |
| 5 | | सामान्य ज्ञान | 20 | 20 | |
| **एकुण** | | | 100 | 100 | |
| **अ.क्र.** | **पदाचे नांव** | **विषय** | **प्रश्न** | **गुण** | **कालावधी** |
| **1** | प्रभाग समन्वयक | मराठी | 14 | 14 | 2 तास |
| **2** | | इंग्रजी | 14 | 14 | |
| **3** | | सामान्य ज्ञान | 14 | 14 | |
| **4** | | बौध्दीक चाचणी | 14 | 14 | |
| **5** | | सामाजिक शास्त्रे | 14 | 14 | |
| **6** | | एमएसआरएलएम(उमेद) | 10 | 10 | |
| **एकुण** | | | 80 | 80 | |
| **मुलाखत** | | | -- | 20 | |
| एकुण गुण (लेखी/ऑनलाईन परीक्षा + मुलाखत)(80+20) | | | | 100 | |

**6.3** सदर परीक्षा हि ऑनलाईन-संगणकाधारित (Online-Computer Based) किंवा लेखी स्वरुपाची राहिल.

**6.4** परीक्षेच्या निकालात ज्या उमेदवारांना समान गुण असतील अशा उमेदवारांना गुणवत्ता क्रम, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. प्रनीमं/1215/(प्र.क्र.55/15)/13-अ दि.05/10/2015 मधील निकषांवर लावला जाईल.

**7. परीक्षा शुल्क :-**

**7.1** परीक्षा शुल्काचा भरणा हा फक्त ऑनलाईन पध्दतीने करावयाचा आहे. परीक्षा शुल्क भरणा करण्याची शेवटची तारीख ही दि.19/09/2018 पर्यंत सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत राहील.

**7.2** मागासवर्गीयांकरिता रु.274/- व अमागास प्रवर्गातील उमेदवारांकरिता रु.374/- प्रवेश/परीक्षा फी राहिल.

**7.3** माजी सैनिकांकरिता परीक्षा/प्रवेश फी रु.23/- राहिल.

**7.4** सदर परीक्षा शुल्क हे ना परतावा स्वरुपाचे असेल.

**8. अर्ज भरण्याची पध्दत:-**

**8.1** प्रस्तुत परीक्षेसाठी फक्त ऑनलाईन पध्दतीने अर्ज स्वीकारले जातील.

**8.2** पात्र उमेदवारांनी वेब आधारित अर्ज जाहिरात प्रसिध्द झालेपासून दिनांक 18/09/2018 चे सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर सादर करता येतील.

**8.3** ऑनलाईन अर्ज सादर करतेवेळी माध्यमिक शालांत प्रमाणपत्रावर असलेल्या नावाप्रमाणेच नावाची नोंदणी करावी अन्यथा अपात्र समजण्यात येईल.

**8.4** विहित मुदतीत परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतले जाणार नाही.

**8.5** परीक्षा शुल्क भरणेकरिता उमेदवारांना खालील पध्दतींचा अवलंब करता येईल:-

**8.5.1** Credit Card/Debit Card/Net Banking

**8.5.2** SBI Challan

**8.5.3** Maha e-Seva Kendra (CSC)

**8.6** उमेदवारांनी तीनही पदांकरिता अर्ज करावयाचा असल्यास त्यांना सदर पदांकरिता स्वतंत्र अर्ज सादर करावेत.

**8.7** सदर पदाकरिता एकाच दिवसी व वेळी परिक्षा घेण्यात येण्याची शक्यता नाकरता येत नाही. त्याबाबतचे स्वतंत्र सूचना विहित संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील.

**9. अटी व शर्ती :-**

**9.1** सदर पात्र उमेदवारांची नियुक्ती हि निव्वळ कंत्राटी स्वरुपाची 11 महिन्याच्या करार कालावधीकरिता करण्यात येईल. रुजू होताना रुपये 100/- च्या बंधपत्रावर करारनामा करुन द्यावा लागेल. सदर पदे नियमित करण्यात येणार नाहित/शासन सेवेत सामावून घेतले जाणार नाहीत.

**9.2** निवडीचे सेवाशर्तीबाबत सर्व अधिकार अध्यक्ष, निवड समिती तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,(जिल्हा अभियान संचालक,एमएसआरएलएम)सोलापूर यांनी राखून ठेवले आहेत.

**9.3** अनुसूचित जाती व जमाती वगळता विमुक्त जाती भटक्या जमाती इतर मागासवर्गीय व विशेष मागास प्रवर्ग यामधील उमेदवारांनी आरक्षणाचा लाभ मिळण्यासाठी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबत सक्षम अधिकाऱ्यांचे कागदपत्र तपासणीचे दिनांकास वैध असणारे नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र तपासणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहिल.

**9.4** महिलांच्या आरक्षणाबाबत शासन निर्णय महिला व बालकल्याण विभाग क्र.82/2001/मसेआ00/प्रक्र415/का-2/दि 25 मे 2001 मधील तरलुदीनुसार खुल्या प्रवर्गातील महिला उमेदवारांना सदर शासन निर्णयात परीशिष्ट 3 मध्ये दिलेले खुल्या प्रवर्गात उन्नती व्यक्ती/गट(क्रिमीलेअर) यामध्ये मोडत नसल्याचे सक्षम अधिका-याचे कागदपत्र तपासणीचे दिनांकास वैध असणारे प्रमाणपत्र तपासणीचे वेळी सादर करणे आवश्यक आहे. तसेच पुरेशा प्रमाणात महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास इतरत्र अदलाबदल न करता त्याच प्रवर्गातील पुरुष उमेदवारांमधून राखीव असलेली पदे भरण्यात येतील.

**9.5** सामान्य प्रशासन अधिसुचना क्रमांक एसआरव्ही-2000/प्र.क्र.(17/2000)12 दिनांक 28 मार्च 2005 व सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्र. एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2000/12 दि 1 जुलै 2005 नुसार लहान कुटुंब असल्याचे विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.(अविवाहित उमेदवारांनी सुध्दा लागू नाही असे नमूद करुन सदर प्रतिज्ञा पत्र सादर करणे आवश्यक आहे.) सदरच्या प्रतिज्ञापत्राचा नमुना या जाहिरातीत जोडलेला आहे.

**9.6** सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. बीसीसी 2011/16-ब दिनांक 12 डिसेंबर 2011 नुसार मागास प्रवर्गाच्या उमेदवारांना त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र नियुक्ती आदेशाचे दिनांकापासून 6 महिन्याचे आत सादर करण्याच्या अटीवर व मा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेशाचे अधीन राहून नियुक्ती दिली जाईल सहा महिन्यात जात वैधता प्रमाणपत्रासाठी परिपूर्ण प्रस्ताव कार्यालयामार्फत समितीकडे सादर करुन जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास कोणतीही नोटीस न देता सेवा समाप्त करण्यात येईल नियुक्ती दिल्यानंतर जात पडताळणीसाठीच्या प्रस्ताव व संबंधितांकडे सादर केल्याची पोच उमेदवाराने कार्यालयास सादर करणे बंधनकारक आहे.

**9.7** अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती किंवा कागदपत्र खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्यांचे पूर्व चरित्र बरोबर नसल्याचे आढळल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी/नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल किंवा नियुक्ती दिल्यानंतर निदर्शनास आल्यास त्याची नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल व त्यानंतर याबाबत उमेदवाराची कोणत्याही प्रकारची तक्रार ऐकून घेतली जाणार नाही. ऑनलाईन अर्ज करतेवेळी भरली जाणारी माहिती हि केवळ प्रवेशपत्र निर्मितीकरिता मर्यादित राहील. सदर माहितीद्वारे कोणीही भरतीप्रक्रीयेतील पात्रता धारण करण्याचा दावा करु शकत नाही. अर्ज करण्यापुवी जाहिरातीतील नमूद पात्रतेच्या अटी व आरक्षणासंदर्भात उपलब्ध पदसंख्या तपासूनच उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज सादर करावेत.

**9.8** या जाहिरातीतील नमूद केलेल्या पदावर उमेदवारांची निवड न्यायालयीन निर्णय शासनाच्या विविध विभागाचे शासन निर्णय व परिपत्रके यातील निर्देशाच्या अधीन असेल.

**9.9**उमेदवार हा महाराष्ट्रातील मूळ रहिवासी असावा उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे डोमिसीअल प्रमाणपत्र (Domicile Certificate) प्राधिकृत अधिकाऱ्याकडून घेतलेले असावे. डोमिसिअल प्रमाणपत्र नसल्यास महाराष्ट्रातील जन्माचा दाखला सादर करणे बंधनकारक राहिल. उपरोक्त बाबत शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या सक्षम अधिका-याचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहिल.

**9.10**शासकीय/निमशासकीय कर्मचा-यांनी त्यांच्या नियुक्ती प्राधिकाऱ्यांची परवानगी घेऊन अर्ज करावा निवड झालेल्या उमेदवारांना सदर पत्राची प्रत प्रमाणपत्र तपासणीवेळी सादर करावी लागेल.

**9.11**वेळोवेळी पदासाठी वेगवेगळा अर्ज करावा लागेल. परंतु एकाच वेळेस वेगवेगळया पदाची परीक्षा आली तर एकाच पदाच्या परीक्षेसाठी उमेदवाराला स्वेच्छेने बसता येईल.

**9.12**अनुभव प्रमाणपत्र मोघम नको. अनुभव प्रमाणपत्रावर संस्थेचा/कार्यालयाचा शिक्का व स्वाक्षरी तसेच जावक क्रमांक असणे आवश्यक आहे तरच, संबंधित पदाचा अनुभव ग्राहय धरण्यात येईल.

**9.13**नॉनक्रीमीलिअर प्रमाणपत्र नजीकच्या काळात काढलेलेअसावे (विमुक्त जाती-ब, भटक्या जमाती/विशेष मागास प्रवर्ग/इतर मागास प्रवर्ग करिता आवश्यक) सदर प्रमाणपत्र दि. 31 मार्च 2019 च्या अर्थिक वर्षा पर्यंत वैध असणे आवश्यक आहे. वैध प्रमाणपत्र नसलेल्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही व अशा उमेदवारांना राखीव संवर्गाचा लाभ घेता येणार नाही.

**9.14** जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रात नाव नोंदणी केली असली तरीदेखील वरील पदासाठी रीतसर अर्जअधिकृत संकेतस्थळावर भरणे, विहित परिक्षा शुल्काचा बँकेत भरणा करणे आवश्यक आहे.

**9.15**उमेदवारांनी त्यांचे निवडीबाबत किंवा निवडीनंतर पदस्थापनेबाबत कोणत्याहि प्रकारचा प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष दबाव, राजकीय दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्यांची निवड रद्द करण्यात येईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**9.16**शासनाने विहित केलेली शारीरिक पात्रता प्रमाणपत्र व चांगली वर्तणूक असल्याचा पुरावा (चारित्र्य प्रमाणपत्र) सादर करणे बंधनकारक राहिल.

**9.17**परीक्षेस पात्र/अपात्र उमेदवारांची यादी, लेखी परीक्षेचा निकाल, प्रारुप निवड यादी, अंतिम निवड यादी व भरती प्रक्रियेसंबंधित देण्यात येणाऱ्या सूचना कार्यालयाचे नोटीस बोर्डावर तसेच www.zpsolapur.gov.in व www.umed.in तसेच http://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळांवर प्रसिध्द करण्यात येईल. याबाबत स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही याची उमेदवारांनी दक्षता घ्यावी.

**9.18**उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेस, कागदपत्र तपासणीसाठी स्वखर्चाने हजर राहावे लागेल.

**9.19** उत्तर तालिका प्रसिध्द झाल्यानंतर त्यावर आक्षेप असल्यास 2 दिवसाच्या आत लेखी आक्षेप पुराव्यासह मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हा अभियान संचालक महाराष्ट्रराज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, सोलापूर यांच्या कार्यालयात किंवा या कार्यालयाचे ईमेल आयडी वर सादर करावेत अशिरा प्राप्त होणाऱ्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

**9.20**जाहिरातीत नमुद अटीत बदल जाहिरातीच्या काही भागात अंशत: बदल वा संपूर्ण भरती प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार अध्यक्ष(उमेद) तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांनी स्वत:कडे राखून ठेवले आहे.

**स्वा/-**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प. तथा**
**जिल्हा अभियान संचालक,**
**एमएसआरएलएम, सोलापूर**

महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन) नियम, 20015 मधील प्रतिज्ञापनाचा नमुना-अ

प्रतिज्ञापत्र

नमुना-अ

(नियम 4 पहा)

मी श्री/श्रीमती/कुमारी------------------------------------------------------------------------

श्री.------------------------------------------------------------------------------यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी,

वय-------वर्षे, राहणार-------------------------------------------------------------------------------------

यांद्वारे पुढील प्रमाणे असे जाहीर करतो/करते की,

(1) मी--------------------------------------या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

(2) आज रोजी मला--------------(संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक 28 मार्च, 2005 यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या--------------आहे. (असल्यास जन्मदिनांक नमूद करावा.

(3) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक 28 मार्च, 2005 यांनतर जन्माला आलेल्या, मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यासा पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाणः-

सही/-

दिनांकः-

(कृपया मागे पहा....

**Declaration**
**Form- A**
**(See Rule- 4)**

**I, Shri./Smt/Kum--------------------------------------------------------------------- Son/daughter/wife of Shri. ------------------------------------------------------------------aged ------------years, resident of-------------------------------------------------------------------- ------------------------------------------------------------------------------------------------------ do hereby declare as follows:-**

1. **That I have filled my application for the opost of-------------------------------------**
2. **I have ----------------(Number) living children as on today. Out of which no. Of children born after 28th March, 2005 is ---------------------------------------------- (Mention dates of birth, if any)**
3. **I am aware that if any total number of living children are more than two due to the children born after 28th March, 2006, I am liable to be disqualified for the same post.**

**Place:-**

**Signature**

**Date:-**

**---------------**